"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर"
कार्यालय : (02164)271346
निवास : (02164)271794
ई- मेल - : str.sgmck-@Sancharnet.in

रयत शिक्षण संस्थेचे

**सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड.**

पिन- ४१५ १२४. जि. सातारा (महाराष्ट्र) पो. ऑ. बॉ. नं.३

**कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन : B+**

स्थापना :१९५४

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

**संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी. लिट.**

**प्राचार्य : व्ही.एस.शिपारे**
एम.ए.

संदर्भ क्र. :
दिनांक : 11.10.2006

# - शिफारस पत्र -

प्रमाणित करण्यात येते की, कु. चंदना जगन्नाथ लोकरे या सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराडच्या शैक्षणिक वर्ष २००४-२००५ या वर्षाच्या एम्. फिल. (मराठी) पदवी अभ्यास क्रमाच्या नियमित विद्यार्थिनी असून त्यांनी "छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या चरित्रावर अधारीत साहित्य कृतीचा अभ्यास" ("दि पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी" हे नाटक आणि "शाहू" या कादंबरीच्या अनुषंगाने) या प्रबंधिकेद्वारे अभ्यास केला आहे. त्यांना श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम (कडेगांव) या कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ. (सौ.) सुलक्षणा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले आहे. तरी त्यांच्या प्रंबधिकेस एम्. फिल. परीक्षेसाठी समावेश व्हावा, अशी शिफारस आहे.

**मराठी विभाग प्रमुख**
स.गा.म.कॉलेज,कराड.

**प्राचार्य**
स.गा.म.कॉलेज,कराड.

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE
KARAD

प्रा. डॉ.सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी
एम्.ए. पीएच्.डी.
मराठी विभाग प्रमुख,
भारती विदयापीठाचे मातोश्री बयाबाई
श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,
कडेगांव, जि.सांगली

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. चंदना जगन्नाथ लोकरे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. या पदवीसाठी सादर केलेली, **छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या चरित्रावर आधारित साहित्यकृतींचा अभ्यास ('द पिलर्स ऑफ सोशल डेमॉक्रसी' हे नाटक आणि 'शाहू' या कादंबरीच्या अनुषंगाने**) या प्रबंधिकेसाठी केलेले सर्व संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. प्रबंधिका लेखनास ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केलेला आहे. परिशिष्टात आवश्यक त्या साधनांची सूची दिलेली आहे.

कु. चंदना जगन्नाथ लोकरे यांनी ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम्.फिल. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

कराड

दिनांक :

प्रा. डॉ. सौ. सुलक्षणा दि. कुलकर्णी
मार्गदर्शक

# - प्रतिज्ञापत्र -

''छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या चरित्रावर अधारीत साहित्य कृतीचा अभ्यास'' या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. सदर प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्य कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कु. लोकरे चंदना जगन्नाथ

दिनांक : / /

अभ्यासक

# मनोगत

प्रत्येक रविवारच्या 'पुढारी' बहारमध्ये लेखक श्रीराम पर्चिंद्रे यांचे राजर्षी शाहू महाराजांवर लेख येत होते. मी सर्व लेख आवर्जून वाचत असे. तसेच धनंजय कीर यांचे 'राजर्षी शाहू छत्रपती-एक क्रांतीकारक राजा' हे संपूर्ण पुस्तक वाचले आणि मला राजर्षी शाहू महाराजांवर आधारित पुस्तकांचे वेध लागले. त्याचवेळी एम्.फिल. प्रवेशासंबंधीची आणि अभ्यासक्रमाविषयीची माहिती मिळवित होते. त्याच कालावधीत लेखक श्रीराम पर्चिंद्रे यांना 'शाहू' या कादंबरीला ''

'' पुरस्कार जाहिर करण्यात आला होता. मी 'शाहू' कादंबरी मिळवून वाचली. त्या कादंबरीची भाषाशैली, वर्णनशैली, कादंबरीची रोचकता तसेच शाहूंना 'माणूस' या दृष्टीकोनातून साकारण्याची कसोटी या गोष्टी मनाला विशेष भावल्या आणि माझा एम्.फिल.चा विषय म्हणून निवडला.

योगायोगाने कोल्हापूर येथील 'पुढारी भवन'मध्ये शाहू कादंबरीकार श्रीराम पर्चिंद्रे यांची व माझी भेट झाली. त्यांनी 'शाहू'कादंबरी संदर्भात मला आवश्यक ती माहिती सांगितली, शिवाय एम्.फिल. अभ्यासासाठी प्रोत्साहन व मदत केली. त्यामुळे मी अतिशय भारावून गेले. त्यांच्या विषयीचा आदर दुणावला. त्यांनी आपला बहुमुल्य वेळ माझ्यासाठी दिला. त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा अहंभाव नाही, गर्व नाही वा आत्मप्रौढी नाही किंबहुना त्यांनी मला 'शाहू' संदर्भातील आवश्यक पुस्तकांची यादी दिली आणि 'भ्रष्टाचाराच्या कथा' हे पुस्तक भेट दिले. तसेच 'मी काही मोठा लेखक नाही किंवा माझे एम्.फिल. वगैरे झालेले नाही परंतु तुम्ही माझी 'शाहू' कादंबरी अभ्यासासाठी निवडली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.' असे बोलून लेखक पर्चिंद्रेचा मनाचा मोठेपणा, नम्रपणा दिसला.

श्रीराम पर्चिंद्रे यांनी 'शाहू' महाराजांना 'माणूस' म्हणून पाहिले आहे. त्यांच्यातील माणूसकी जाणली आहे. अगदी बारीकसारीक गोष्टींचाही तपशील त्यांनी 'शाहू' या कादंबरीत चित्रीत केला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर नेमकेपणाने चित्रण 'शाहू' या कादंबरीत केलेले आहे.

शाहू महाराज नाट्यरूपाने आजच्या आधुनिक युवा पिढीसमोर आणले तर तरूण जास्त आत्मसाद करतील या दृष्टीकोनातून लेखक अरूण मिरजकरांनी 'द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी' हे नाटक लिहिले आहे. मनोरंजनातून प्रबोधन हा हेतू मनी बाळगून मिरजकरांनी शाहू महाराजांवर लिहिलेले नाटक एक उत्कृष्ट कलाकृती आहे.

# ऋणनिर्देश


आजच्या वर्तमानकालीन समाजात मी एक 'स्त्री' म्हणून वावरताना अनेक अडीअडचणी मला आल्या, आणि येत आहेत तरीही त्यातून मी स्वत:ला निभावून नेण्याचा आटोकाट प्रयत्न करते आहे. कारण माझ्या पाठीशी मोठ्या आदरणीय व्यक्तींचा आणि गुरूवर्यांचा आशिर्वादाचा हात आहे. माझ्या मनावरील दडपण सर्रकन खाली झटकून टाकणाऱ्या माझ्या गुरू डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी मॅडम त्यांनीच मला आज प्रबंधिकेच्या रूपाने ऋणनिर्देश लिहिण्याचा अधिकार मिळवून दिला, अन्यथा माझे एम्.फिल. झाले नसते आणि ऋणनिर्देश लिहिण्याचा आनंदही घेता आला नसता. माझ्या एम्.फिल.च्या मार्गदर्शिका डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी मॅडम यांच्या ऋणात मी कायमस्वरूपी राहू इच्छिते.

माझे मिस्टर डॉ. अनिल लोखंडे यांनी अनेक व्याप सांभाळून मला वारंवार आर्थिक आणि वैचारिक मदत केली आणि माझ्या प्रबंधिकेस सतत प्रोत्साहन दिले. यासाठी मी स्वत:ला भाग्यवान समजते आणि मी त्यांचा आदर करते. माझी छोटी कन्या अनुजा हिने माझ्या कामाला गती देण्यास मदत केली. शिवाय माझे पूजनीय आई-वडिल, बहिणी, शेजारच्या सौ. राखी लकडे वहिनी, सौ. सुनीता लोखंडे (मावशी) यांचेही मी आभार मानते.

बळवंत कॉलेज विटा येथील प्राचार्य डॉ. शंकरराव कदम, जाधव सर, शिवाय ग्रंथालयातील इतर कर्मचारी वर्ग या सर्वांनी मला वेळोवेळी पुस्तके उपलब्ध करून दिली त्यामुळे मी त्यांची आभारी आहे. विटा येथील 'मुक्तांगण' वाचनालयातील सर्व गुरूबंधू, 'मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय' कडेगांव येथील ग्रंथालय, सौ. उल्का पाटील, प्रा. डॉ. डी.आर. गायकवाड, एस.जी.एम्. कॉलेज, कराड येथील प्राचार्य डॉ. राजमाने सर, प्रा. संभाजीराव देसाई (मराठी विभाग प्रमुख) प्रा. सौ. निकम, प्रा. सौ. रैनाक, प्रा. डॉ. सौ. दिवेकर मॅडम, प्रा. जाधव, प्रा. डॉ. सुमन पाटील, डॉ. कन्हैया कुंदप, प्रा.सौ. सूर्यमाला जाधव, डॉ. पी.बी. पाटील या सर्वांनी मला मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील मराठी विभाग प्रमुख, डॉ. किरवले सर यांचे मनापासून आभार. शेवटी प्रबंधिकेची छपाई व बांधणी वेळेत पूर्ण करून देणाऱ्या सौ. ज्योती नांदेडकर, कराड यांचेही मी आभार मानते.

चंदना जगन्नाथ लोकरे

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| प्रकरण १ | चरित्र वाङ्मय संकल्पना आणि स्वरूप | १ ते २१ |
| प्रकरण २ | शाहू चरित्रपर नाटक 'द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी' | २२ ते ५६ |
| प्रकरण ३ | शाहू चरित्रपर कादंबरी 'शाहू' | ५७ ते ९८ |
| प्रकरण ४ | 'द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी' नाटक आणि 'शाहू' कादंबरी या दोन साहित्यकृतींचा वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास | ९९ ते १४० |
| प्रकरण ५ | उपसंहार | १४१ ते १४४ |
| | परिशिष्टे :- | १४५ ते १५३ |
| | १) लेखक परिचय | १४५ ते १४९ |
| | २) संदर्भ ग्रंथ सूची (नाटकासाठी) | १५० ते १५१ |
| | (कादंबरीसाठी) | १५२ ते १५३ |